# लॉकडाऊनमध्येही मुद्रित माध्यमे विश्वासार्ह

## पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे सर्वेक्षण

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लॉकडाऊनच्या काळातही डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांपेक्षा मुद्रित माध्यमे अधिक विश्वासार्ह आहेत, अशी माहिती संशोधनातून पुढे आली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या वतीने केलेल्या ऑनलाईन सर्वेक्षणात मुद्रित माध्यमांवरच सर्वाधिक विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. अध्यासनाच्या 'पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम' या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी हा सर्व्हे केला.

कोरोनामुळे राज्य आणि केंद्र सरकारने सुरक्षिततेचा उपाय म्हणून लॉकडाऊन घोषित केला आहे. लॉकडाऊनच्या काळात विविध प्रसारमाध्यमांचा कशा पद्धतीने उपयोग होतो, याचा अभ्यास अध्यासनाच्या वतीने करण्यात आला. पारंपरिक, मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि वेब माध्यमांना वाचक, श्रोते-दर्शक आणि यूजर्स कसा प्रतिसाद देतात, हे पाहणे अभ्यासाचे उद्दिष्ट होते. या काळात कोणत्या माध्यमातून येणारी माहिती अधिक विश्वासार्ह वाटते, याची माहिती जाणून घेण्याचाही या अभ्यासातून प्रयत्न करण्यात आला, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली. लॉकडाऊनच्या काळात माध्यमांच्या वापरासंदर्भातील एक प्रश्नावली तयार करण्यात आली. ही प्रश्नावली ऑनलाईन पद्धतीने भरून घेण्यात आली. महाराष्ट्रासह इतर राज्यांतूनही काही उत्तरदात्यांनी या प्रश्नावलीला प्रतिसाद दिला. ३०० हून अधिक जणांनी ही प्रश्नावली भरून दिली.

प्रश्नावलीचे विश्लेषण केले असता, मुद्रित माध्यमे सर्वाधिक विश्वासार्ह असल्याचे मत ६९.३ टक्के उत्तरदात्यांनी नोंदवले. १९.६ टक्के लोकांच्या मते, इंटरनेट तसेच मोबाईलवरील माहिती विश्वासार्ह आहे, तर इलेक्ट्रॉनिक माध्यमातील माहिती विश्वासार्ह असते, असे मत ८.१ टक्के लोकांनी व्यक्त केले. ३ टक्के लोकांना पारंपरिक माध्यमे विश्वासार्ह वाटतात. याचाच अर्थ मुद्रित माध्यमांची विश्वासार्हता इतर माध्यमांच्या तुलनेत कैकपटीने जास्त आहे. लॉकडाऊनच्या काळात सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. सोशल मीडियासाठी लोकांनी लॉकडाऊनच्या काळात पूर्वीपेक्षा जास्त वेळ दिला. लॉकडाऊनपूर्वी सोशल मीडियासाठी दिवसातील २ ते ४ तास वेळ देणाऱ्यांची संख्या २०.३ टक्के होती; पण लॉकडाऊनच्या काळात ही संख्या वाढून ३९.५ टक्के झाली. म्हणजेच लोक जास्त काळ सोशल मीडियाचा वापर करत आहेत. लॉकडाऊनच्या काळात सोशल मीडियापैकी व्हॉटस् ॲपचा वापर सर्वाधिक होत असल्याचेही या अभ्यासातून स्पष्ट झाले आहे. ५५.७ टक्के लोक लॉकडाऊनमध्ये व्हॉटस् ॲपचा वापर करत आहेत. यू ट्यूब, ट्विटर, फेसबुक यासह अन्य माध्यमांपेक्षाही व्हॉटस् ॲपसाठी जास्तीत जास्त वेळ दिला जात असल्याचे हा अभ्यास सांगतो.

इलेक्ट्रॉनिक वृत्त माध्यमांचाही यावेळी अभ्यास करण्यात आला. यामध्ये मराठी वृत्तवाहिन्या पाहण्याकडे जास्त लोकांचा कल असल्याचे समोर आले. ६३.२ टक्के लोक माहिती मिळविण्यासाठी मराठी वृत्तवाहिन्या पाहतात. हिंदी आणि इंग्रजी वृत्तवाहिन्या पाहणाऱ्यांची संख्या तुलनेने कमी आहे. स्थानिक भाषेतील माध्यमे वापरणे सोयीचे असल्याने बहुतेक लोक मराठी वृत्तवाहिन्या पसंत करत आहेत. लॉकडाऊनपूर्वी वृत्तवाहिन्या पाहण्याची वेळ कमी होती. लॉकडाऊनच्या काळात वृत्तवाहिन्या पाहण्यासाठी दर्शकांकडून अधिकचा वेळ दिला जात आहे.

### वस्तुनिष्ठ माहितीसाठी मुद्रित माध्यमांचाच आधार

लॉकडाऊनच्या काळात माहिती मिळविण्यासाठी मुद्रित, इलेक्ट्रॉनिक तसेच वेब माध्यमांचा आधार घेण्यात आला. परंतु, माहितीची सत्यता आणि विश्वासार्हता आदींसाठी मुद्रित माध्यमांवरच अद्यापही लोकांची भिस्त आहे. याच काळात इतर माध्यमांना वेळ देण्याचे प्रमाण वाढले असले, तरी वस्तुनिष्ठ माहितीसाठी लोक मुद्रित माध्यमांचाच आधार घेत असल्याचे या अभ्यासातून समोर आले आहे.

# वसंतराव नाईक यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा कृषी क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, नेहरू अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. रवींद्र भणगे उपस्थित होते.

# कुलगुरुपदासाठी उमेश कदम, खरात यांचे अर्ज

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी ऑनलाईन अर्ज करण्याच्या अखेरच्या दिवशी गुरुवारी दिल्लीतील जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील इतिहासाचे प्रोफेसर डॉ. उमेश कदम व स्कूल ऑफ लाइफ सायन्सेसचे प्रोफेसर डॉ. अरुण खरात यांनी अर्ज केल्याचे समजते. परंतु त्याबद्दल अधिकृत सूत्रांकडून दुजोरा मिळाला नाही. -वृत्त/८

# कुलगुरुपदासाठी उमेश कदम, खरात यांचे अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी ऑनलाईन अर्ज करण्याच्या अखेरच्या दिवशी गुरुवारी दिल्लीतील जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील इतिहासाचे प्रोफेसर डॉ. उमेश कदम व स्कूल ऑफ लाइफ सायन्सेसचे प्रोफेसर डॉ. अरुण खरात यांनी अर्ज केल्याचे समजते. परंतु त्याबद्दल अधिकृत सूत्रांकडून दुजोरा मिळाला नाही.

या पदासाठी अर्ज दाखल केलेल्या एकूण अर्जांची संख्या १९ इतकी झाली.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाल संपल्यानंतर रिक्त झालेल्या पदासाठी ही प्रक्रिया सुरु आहे. डॉ. कदम हे मूळचे कोल्हापुरातील सुभाषनगरातील आहेत. त्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागात काम केले आहे. त्यांचे शिक्षणही कोल्हापुरात झाले आहे. 'जेएनयू'मध्ये ते २०१३ पासून कार्यरत आहेत. विद्यापीठीय शिक्षणाचा त्यांना २० वर्षांचा अनुभव आहे. डॉ. खरात यांनी २००८ ते २०१७ पर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उस्मानाबाद केंद्रात बायोटेक्नॉलॉजीमध्ये प्रोफेसर म्हणून काम केले आहे. अमेरिकेतील रॉकफेलर फेलोशिपचे ते मानकरी आहेत. याशिवाय शिवाजी विद्यापीठाचे पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, माजी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, उच्च, तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांचे ओएसडी राजेंद्र सोनकवडे, राज्याच्या गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. पी. एस. पाटील, यांच्यासह एकूण १७ जणांचे अर्ज ऑनलाईनद्वारे दाखल झाले आहेत.

गुरुवारी अखेरच्या दिवशी डॉ. कदम व डॉ. खरात यांच्या अर्जांची भर पडली. या अर्जाची प्रत १० जुलैपर्यंत सादर करण्याची मुदत आहे. त्यानंतर त्रिसदस्यीय शोध समिती अर्जांची छाननी करुन त्यातील पाच पात्र नावांची शिफारस कुलपतींकडे करणार असून, निवड झालेल्या पाचजणांच्या मुलाखती होतील. या प्रक्रियेनंतर नव्या कुलगुरुंचे नाव जाहीर होईल.

# ‘जेएनयू’तील प्राध्यापकही कुलगुरूपदासाठी इच्छुक



कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या दोन प्राध्यापकांनी अर्ज केल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. आज ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम दिवस होता. सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, मुंबई याबरोबरच अन्य राज्यातील इच्छुकांनी शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी अर्ज केले आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची आज अंतिम तारीख होती. शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असणाऱ्या कोल्हापूर, सांगली, सातारा या जिल्ह्यातून सुमारे ११ अर्ज कुलगुरू पदासाठी आले आहेत. या शिवाय पुणे येथून तीन आणि मुंबई येथून एक अर्ज प्राप्त झाल्याचे समजते. दिल्ली येथील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील दोन प्राध्यापकांनी कुलगुरू पदासाठी अर्ज केले आहेत. यातील एक प्राध्यापक पूर्वी शिवाजी विद्यापीठात अध्यापनाचे काम करत होते. या शिवाय शिवाजी विद्यापीठातील कीड रसायनशास्त्र विभागाचे विभागप्रमूख डॉ. संजय चव्हाण यांनाही या पदासाठी अर्ज केल्याची माहिती पुढे आली आहे.

ऑनलाईन अर्ज करण्याचा आज अंतिम दिवस होता. मात्र पोस्टाने अर्ज करण्याची शेवटची मुदत १० जुलै आहे. अर्जांची छाननी, मुलाखती आणि त्यातून कुलगुरूंची निवड केली जाईल.

# कुलगुरूपदासाठी 'जेएनयू'मधून दोघांचे अर्ज

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ कुलगुरूपदासाठी अर्ज करण्याची मुदत २ जुलै रोजी संपली. दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील दोन प्राध्यापकांनी अर्ज केल्याची माहिती समजते. कुलगुरू निवडीसाठी अर्ज प्रक्रियेस ३ जून रोजी सुरुवात झाली. कुलपतींनी नेमलेल्या त्रिसदस्यीय शोध समिती ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले. विद्यापीठातील



अधिविभाग, पुणे, मुंबई, सांगली, सातारा व सोलापूरसह अन्य ठिकाणचे प्राचार्य, प्राध्यापक यांनी अर्ज केले आहेत. दरम्यान, ई-मेलद्वारे अर्जाची मुदत २ जुलैपर्यंत होती. ती कायम ठेवून निवड समितीने हार्ड कॉपी टपालाने पाठविण्यास १० जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे.



# कुलगुरूपदासाठी १९ अर्ज दाखल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदासाठी एकूण १९ दाखल झाले आहेत. गुरुवारी त्रिसदस्यीय शोध समितीकडे ऑनलाइन अर्ज करण्याच्या अखेरच्या दिवशी दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील डॉ. उमेश कदम, डॉ. अरुण खरात या दोन प्राध्यापकांनी अर्ज केले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यकाळ संपल्याने शोध समितीकडून अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले होते. २ जुलै ही ऑनलाइन अर्ज करण्याची तर १० जुलै ही अर्जांची हार्ड कॉपी जमा करण्याची मुदत आहे. ऑनलाइन अर्ज करण्याच्या अखेरच्या दिवसापर्यंत एकूण १९ अर्ज आले. अखेरच्या दिवशी अर्ज केलेल्या डॉ. कदम यांनी शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागात काम केले आहे. डॉ. खरात हे जेएनयूमध्ये वरिष्ठ प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्रिसदस्यीय समितीकडे माजी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. डी. राऊत, राजेंद्र सोनकवडे, डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह एकूण १७ जणांचे अर्ज ऑनलाइनद्वारे दाखल झाले आहेत.

# नव्याचा ध्यास घेतल्यानेच विद्यापीठे तरतील!

**शिक्षण** ही विद्या व ज्ञानाच्या संप्रेषणाची पद्धत आहे. गुरूने शिष्याला ज्ञान देण्याची ही पद्धत काळानुसार नेहमीच बदलत आहे. इसवी सन आठव्या शतकात होऊन गेलेल्या आदिशंकराचार्यांचे पद्मपाद, हस्त मलाका, त्रोटकाचार्य व सुरेश्वर हे चार शिष्य होते. गुरुप्रमाणेच हे शिष्यही प्रकांड बुद्धिमान होते. वेदकाळापासून चालत आलेल्या गुरु-शिष्य परंपरेचे पालन करत त्यांनी अद्वैत वेदांताच्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी भारतवर्षाच्या चार दिशांना चार मठ स्थापन केले. ते आध्यात्मिक हिंदू परंपरेचे आधारस्तंभ आहेत. महाभारत त्याच्या आधी म्हणजे इसवीपूर्व ३०६७ मध्ये घडले. महाभारतानेही शिक्षण पद्धतीत बदल करण्यात मोठी भूमिका बजावली. निशाधचा राजपुत्र असलेल्या एकलव्याला गुरु द्रोणाचार्यांनी त्या काळी रुढ असलेल्या सामाजिक क्षुद्रतेच्या कल्पनेतून शिष्य म्हणून स्वीकारण्यास नकार दिला; तरीही आज ज्याला डिस्टन्स वा ऑनलाईन लर्निंग म्हणता येईल, त्या पद्धतीने एकलव्य धनुर्विद्येत पारंगत झालाच. 'कोविड-१९'च्या निमित्ताने आधुनिक शिक्षणपद्धतीसही अशीच आमूलाग्र कलाटणी मिळेल का? तसे झाल्यास भविष्यातील विद्यापीठे कशी असतील?

विद्यापीठ हा अध्यापक व विद्वानांचा समुदाय असतो. तेथे ज्ञानोपासनेचे पूर्ण स्वातंत्र्य असायलाच हवे. त्यामुळे काळानुरुप पद्धत बदलली तरी विद्यापीठाचे मूळ हेतू व उद्देश कायम राहायलाच हवेत. विद्यार्जन हे माध्यम आहे व त्यासाठी घेतल्या जाणाऱ्या परिश्रमाचे पदवी हे फळ असते. अनेक गोष्टींमुळे विद्यापीठ शिक्षणाचे स्वरुप बदलते आहेच. यापैकी काही बाबी म्हणजे विद्यार्थ्यांची अवाढव्य संख्या, अध्यापकांची कमतरता व त्यांची सुमार पात्रता, शिकून बाहेर पडूनही उपलब्ध नसलेल्या नोकऱ्या, आदी. त्यात आता 'कोविड'ची भर पडली आहे. या प्रत्येत बाबीचा वापर आपण चांगल्यासाठी करुन घ्यायला हवा.

विद्यापीठांमधून रोजगारक्षम शिक्षण दिले जात नसल्याची उद्योगधुरिणांची जुनीच तक्रार आहे. सखोल व समग्र ज्ञानाऐवजी विद्यापीठे संशोधनावर अवास्तव भर देतात. विद्यापीठांचे व्यवस्थापन व अध्यापकवर्गाला दिले जाणारे पगार हेही ज्ञानोपासक वातावरणास पोषक नाहीत. मंजूर होणे व परतफेड या दोन्ही दृष्टीने शैक्षणिक कर्ज ही






**डॉ. एस. एस. मंठा**
माजी अध्यक्ष
भारतीय तंत्रशिक्षण परिषद

मोठी समस्या आहे. विद्यापीठ शिक्षणावर होणारा खर्च व त्यातून मिळणारे फलित यांचाही मेळ बसत नाही. समाजाच्या गरजा व तंत्रज्ञान या दोन्ही बाबतीत विद्यापीठे मागे पडतात. भविष्यातील विद्यापीठांमध्ये संमिश्र पद्धतींची भूमिका फार महत्वाची असणार आहे. भविष्यातील शिक्षण काही प्रमाणात ऑनलाईन असणार आहे. अशा शिक्षणात विद्यार्थ्यांची गती पाहून त्यानुसार प्रत्यक्ष वर्गातील शिक्षणाचे स्वरुप आणि प्रमाण ठरवावे लागेल.

आधुनिक उद्योग व त्यातील प्रचंड स्वचालन तंत्रज्ञान यानुसारच श्रमशक्तीही असावी लागेल. आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, डीप लर्निंग, रोबोटिक्स, क्लाऊड टेक्नॉलॉजी, डेटा ॲनॅलिटिक्स हे आताचे परवलीचे शब्द आहेत. प्रत्यक्ष मानवी काम व संगणकीय प्रणाली यांच्यात योग्य समन्वयाची 'सायबर फिजिकल सिस्टीम' खोलवर रुजली आहे. भविष्यात माणसे फक्त यंत्र चालविणार नाहीत, तर त्यांच्याशी संवाद साधू लागतील. त्यातून 'इंटरनेट ऑफ पीपल' व 'इंटरनेट ऑफ थिंग्ज'चे सुंदर संमित्र विश्व उदयास येईल. हे सर्व परिवर्तन हात धरून पुढे नेऊन ते समाजात रुजविण्याची भूमिका विद्यापीठांनाच पार पाडायची आहे.

भविष्यात गुंतागुंतीचे प्रश्न सोडविण्याची क्षमता, तीक्ष्ण विचारशक्ती, सृजनात्मकता, माणसांचे व्यवस्थापन, बुद्धीला भावनेचीही जोड देणे, अचूक निर्णय घेणे, आदी नव्या युगाची कौशल्ये आवश्यक असणार आहेत. यापैकी प्रत्येक कौशल्य विद्यापीठाच्या चार भिंतींच्या आत राहून देता येईलच असे नाही. त्यामुळे कॅम्पसएवढेच शिक्षण बाहेरही द्यावे लागेल. यासाठीची योग्य व दर्जेदार साधने ऑनलाईन व ऑफलाईन सर्वांना सहज उपलब्ध करावी लागतील. ही साधने संवादात्मक, थेट मुद्दे मांडणारी, मोबाईलवर वापरता येणारी व भावनेला चटकन हात घालू शकतील, अशी हवीत. कोर्सेरा, यूडेमी, यूडॅसिटी, लिंक्डइन, एडएक्स व फ्युचरलर्न यांसारख्या जागतिक पातळीवरील साधनांच्या भाऊगर्दीमुळे विद्यार्थी व अध्यापकही गोंधळून गेले आहेत. भविष्यातील विद्यापीठ शिक्षणाचे स्वरूप संमिश्र असेल. बऱ्याच प्रयोगाअंती कदाचित ऑनलाईन व ऑफलाईनचे ३०:७० किंवा ४०:६० हे प्रमाण सोयीचे होईल. त्यामुळे भविष्यातील विद्यापीठांच्या रचनात्मक ढाच्यात बदल करावा लागेल, वेगळे व्यावसायिक मॉडेल विकसित करावे लागेल, विज्ञाशाखांत निरंतर समन्वयाची व्यवस्था करावी लागेल. अध्यापकांनाही बदल आत्मसात करावे लागतील. रँकिंग, रेटिंग व ॲक्रेडिशनच्या कालबाह्य कल्पनांचा त्याग करून दर्जेदार शिक्षण हा विद्यापीठांचा अंगभूत भाग व्हावा लागेल. परीक्षा व पदव्यांच्या पद्धतीतही आमूलाग्र बदल करावा लागेल. हवे ते विषय एकत्र करून कुवतीनुसार कमी-अधिक वेळात पदवी घेण्याची सोय करावी लागेल. व्हर्च्युअल शिक्षणासाठीही अद्ययावत तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून घ्यावा लागेल. शिक्षकांना गाईड व मेंटॉर व्हावे लागेल.

विद्यापीठांना देशापुढील प्रश्न सोडविण्याची व गरजा भागविण्याची उद्योगांच्या निकट सहकार्याने चालणारी समस्या निवारण केंद्रे व्हावे लागेल. विद्यापीठांचे 'फंडिंग मॉडेल' बदलावे लागेल. विद्यार्थ्यांना मान मोडेपर्यंत खर्डेघाशी करायला लावून भागणार नाही. इतरांशी चर्चा करून व अवांतर वाचन करून स्वत:चा विचार विकसित करण्यासाठी व मनाची कवाडे रुंदावण्यासाठी त्यांना मोकळा वेळ द्यावा लागेल. त्यातूनच विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानाऐवजी परिपूर्ण जीवन जगण्याची कुंजी मिळू शकेल.

### व्यावसायिक विद्याशाखांचे ऑनलाइन अभ्यासक्रम

# स्वायत्त परिषदांच्या मान्यता आणि वैधतेबाबत संभ्रम

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** करोनाच्या प्रादुर्भावामध्ये बहरलेल्या ऑनलाइन शिक्षणाच्या बाजारपेठेत अनेक विद्यापीठांनी व्यावसायिक व तंत्रज्ञान विद्याशाखांची ऑनलाइन पदवी देण्यास सुरुवात केली आहे. मात्र, या अभ्यासक्रमांचे नियमन करणाऱ्या स्वयत्त परिषदांची मान्यता आणि पदव्यांच्या वैधतेबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत.

नियमानुसार तंत्रज्ञान व व्यावसायिक विद्याशाखांचे अभ्यासक्रम हे ऑनलाईन किंवा दूरशिक्षण पद्धतीने चालवण्याची परवानगी नाही. दूरशिक्षणासाठीही देशातील मोजक्याच विद्यापीठांना परवानगी देण्यात आली आहे. मात्र, सध्या देशभरात सुरू झालेली खासगी विद्यापीठे व्यावसायिक विद्याशाखांचे पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रम दूरशिक्षण पद्धतीने सुरू केले आहेत.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे ऑनलाइन शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे धोरण शासनाने स्विकारले आहे. मात्र, त्यात नियमित अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन परिस्थिती पूर्ववत होईपर्यंत ऑनलाइन माध्यमातून शिक्षण देणे अपेक्षित आहे. मात्र, विद्यापीठांनी ऑनलाइन, घरबसल्या पदवी देण्याची जाहिरातबाजी सुरू केली आहे. अशा स्वरूपातील पदवी देणाऱ्या अभ्यासक्रम संस्थांचे सध्या पेव फुटले आहे. काही संस्था परदेशी विद्यापीठांची पदवी देण्यात येणार असल्याचेही सांगत आहेत. मात्र, या पदव्यांच्या मान्यतेबाबत संभ्रम आहे.

## दुकानदारी

कौशल्य विकासाची गरज लक्षात घेऊन शासनाने या अभ्यासक्रमांना प्रोत्साहन देण्याचे धोरण आखले. अनेक संस्थांनी कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू केले. सध्या या संस्थाही नोकरीची हमी देत हे अभ्यासक्रम ऑनलाइन राबवत आहेत. बहुतेक अभ्यासक्रमांसाठी संस्थेचे प्रमाणपत्र देण्यात येते. मात्र, त्याच्याही वैधतेबाबत प्रश्न आहेत.

“ व्यवस्थापन, पर्यटन, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स या विद्याशाखांचे दूरशिक्षण सुरु करण्यासाठी काही संस्थांनी परवानगी मागितली होती. त्यांना परवानगी देण्यात आली आहे. मात्र, बाकी अभ्यासक्रम दूरशिक्षण पद्धतीने चालवता येणार नाहीत.

– डॉ अनिल सहस्रबुद्धे,
अध्यक्ष, अ. भा. तंत्रशिक्षण परिषद

## काय काळजी घ्यावी ?

- अभ्यासक्रम नियमित स्वरूपातील आणि की दूरशिक्षण याची प्रवेश घेण्यापूर्वी खात्री करावी
- दूरशिक्षण अभ्यासक्रमासाठी दूरशिक्षण परिषदेची मान्यता आहे का हे पाहावे
- तंत्रशिक्षण विषयातील अभ्यासक्रम दूरशिक्षण पद्धतीने राबवताना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची (एआयसीटीई) मान्यता असल्याची खातरजमा करावी
- कौशल्य विकास अभ्यासक्रमांसाठी राष्ट्रीय कौशल्य विकास मंडळाची (एनएसडीसी) मान्यता असल्याची खातरजमा करावी

# रविवारपासून क्रीडाविषयक आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ क्रीडा अधिविभाग व देशभक्त रत्नाप्पा कुंभार वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने व कोल्हापूर जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने ५ व ६ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले आहे.

'कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य, शारीरिक शिक्षण आणि क्रीडा' असा वेबिनारचा विषय आहे. दोन दिवसीय वेबिनारमध्ये शारीरिक शिक्षण व क्रीडा विषयांतील आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ सहभागी होऊन मार्गदर्शन करणार आहेत. ५ जुलै रोजी दुपारी चार वाजता पालकमंत्री व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष सतेज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली वेबिनारचे उद्घाटन होईल. यावेळी डॉ. गोर्डाना मार्कोविक (सर्बिया), डॉ. वालिद मार्सेल (लेबेनॉन), डॉ. ब्रॉन्को सिसिक (बेलग्रेड-सर्बिया) आणि डॉ. बॉंग पास्कल (फिलिपाईन्स) हे उद्घाटनपर संदेश देतील. क्रीडा विभागाचे उपसंचालक डॉ. माणिक ठोसरे, शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा डॉ. रजनीताई मगदूम, डॉ. विश्वनाथ मगदूम, प्रसाद कामत, ॲड. व्ही. एन. पाटील, ॲड. वैभव पेडणेकर आदी सहभागी होणार आहेत, अशी माहिती क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी दिली.